दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## सुविचार

"कुणालाही आपण शब्द देतो, तेव्हा मनात आशेची बीजं रुजतात. तो शब्द पाळल्यास, विश्वासाची मुळे घट्ट रुजतात. शब्द हा फक्त संवाद नाही, तर तो सामाजिक बांधिलकीचा आधार आहे."

## पिंपरीतील सिटी-१ मॉलला आग

**पुणे :** पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी येथील सिटी-१ मॉलमध्ये आज (मंगळवार, दि. २३ डिसेंबर) सायंकाळी अचानक आग लागली. मॉलमध्ये नूतनीकरणाच्या कामाच्या दरम्यान ही आग लागल्याची माहिती सूत्रांनी दिली. महापालिकेचे मुख्य अग्निशमन केंद्र, चिखली आणि नेहरूनगर असे चार अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी पोहोचले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. २४ डिसेंबर, २०२५ | वर्ष - १ | अंक - ९१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### दिल्ली शहरात कडक सुरक्षा व्यवस्था

**नवी दिल्ली :** ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला दिल्ली पोलिसांच्या कडक सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सुमारे २०,००० पोलिस आणि निमलष्करी कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. राष्ट्रीय राजधानीच्या सीमा हरियाणा आणि उत्तर प्रदेशला लागून असल्याने आणि राजस्थानच्या जवळ असल्याने, सीमावर्ती भागात पोलिस तैनात करण्यात आले आहेत. या राज्यांमधून नवीन वर्षाच्या उत्सवासाठी शहरात मोठी गर्दी येण्याची अपेक्षा आहे.

### विद्यार्थ्यांना ओलीस ठेवून दीड लाखांची लूट

**बेंगळुरू :** शहराच्या बाहेरील एका लोकप्रिय फूड जॉइंटमध्ये बिर्याणी खाऊन परतत असताना अभियांत्रिकीच्या चार विद्यार्थ्यांना बंदी बनवून १.५ लाख रुपये लुटण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. २१ डिसेंबर रोजी होस्कोट येथील एका भोजनालयात सकाळी सहलीवरून विद्यार्थी दुचाकीवरून परतत असताना ही घटना घडली, असे त्यांनी सांगितले.

### २२ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**भुवनेश्वर:** ओडिशाच्या मलकांगिरी जिल्ह्यात २.१८ कोटी रुपयांचे बक्षीस असलेल्या बावीस माओवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांनी ओडिशाचे डीजीपी वाय.बी. खुरानिया आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नऊ बंदुका आणि १५० काडतुसे, २० किलो स्फोटके, १३ आयईडी, जिलेटिन स्टिक्स आणि इतर वस्तू सुपूर्द केल्या. हे सर्व माओवादी शेजारच्या छत्तीसगडचे होते.

## एकनाथ शिंदेंना हव्यात १२५ जागा; भाजप देत आहे केवळ ९० जागा

# भाजपला धनुष्यबाण नावापुरतेच हवे..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक जवळ येत असताना महायुतीतील जागावाटपावरून तणाव वाढताना दिसतो आहे. भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांच्यात अद्याप अंतिम एकमत झालेले नाही.**



शिवसेनेने १२५ जागांची मागणी केली असतानाही, भाजपने त्यांना केवळ ५२ जागा देऊ केल्या. आता भाजपने ९० जागांचा नवा फॉर्म्युला दिला असला, तरी तो एकनाथ शिंदे यांना मान्य नसल्याची माहिती आहे. शिवसेनेने अजूनही दोन डझन जागांची मागणी करण्यात येत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, युतीच्या पहिल्याच बैठकीत शिवसेनेने १२५ जागांची मागणी केली होती. त्या वेळी भाजपने केवळ ५२ जागांची ऑफर दिली होती. मात्र, सोमवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या महत्त्वाच्या चर्चेनंतर भाजपने ही संख्या वाढवून ९० पर्यंत नेली. तरीही शिंदे यांना हा प्रस्ताव अपुरा वाटतो आहे. आधी १२३ जागांची मागणी करणाऱ्या शिंदे यांनी ती आता ११२ जागांपर्यंत खाली आणली असली, तरी दोन्ही पक्षांतील मतभेद अजूनही मिटलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस लवकरच शिंदेंशी पुन्हा चर्चा करणार असल्याचे बोलले जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील निकालांमुळे भाजप अधिक आक्रमक भूमिकेत असल्याचे चित्र आहे. राज्यभरात भाजपने ११७ नगरपरिषद अध्यक्षपदे जिंकली आहेत. त्याचवेळी शिंदे गटाच्या शिवसेनेला ५३, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ३७ अध्यक्षपदे मिळाली. या कामगिरीच्या आधारावर भाजप आपल्या मित्रपक्षांना अधिक जागा देण्याच्या मूडमध्ये नसल्याचे स्पष्ट होते.

दरम्यान, बीएमसी निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा महायुतीत सहभाग असेल की नाही, याबाबतही अद्याप स्पष्टता नाही. राष्ट्रवादी जर मुंबईत युतीचा भाग म्हणून निवडणूक लढवणार असेल, तर सध्याच्या जागावाटपाच्या समीकरणात बदल करावा लागणार आहे. अजित पवार आणि प्रफुल्ल पटेल मुंबईत आल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी दिली.

महायुतीसमोरील आणखी एक मोठा अडथळा म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक. त्यांच्यावर भ्रष्टाचार आणि मनी लॉन्डरिंगचे गंभीर आरोप आहेत. भाजपने नवाब मलिक यांच्यासोबत निवडणूक लढवणार नसल्याचे ठामपणे जाहीर केले आहे.

मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी स्पष्ट सांगितले की, राष्ट्रवादीला युतीत राहायचे असेल तर नवाब मलिक यांना बाजूला ठेवावे लागेल आणि केवळ १० ते १४ जागांवर समाधान मानावे लागेल.

दरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल. नामांकन प्रक्रिया २३ डिसेंबर २०२५ पासून सुरू झाली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एकूण २२७ निवडणूक प्रभाग आहेत. याशिवाय महापालिकेच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या पाच नगरसेवकांची तज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात येते.

## आकडेवारीत घट झाली; अपघात मात्र थांबत नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात रस्ता अपघातांतील मृत्युदर घटल्याचा दावा परिवहन विभागाकडून केला जात असला, तरी प्रत्यक्ष रस्त्यांवरील परिस्थिती पाहिली असता हा दावा फक्त कागदापुरता मर्यादित असल्याचे दिसते. महामार्ग असोत की शहरातील मुख्य रस्ते—वेग, ओव्हरलोड वाहने, खराब रस्ते आणि नियमभंग हे अपघातांचे प्रमुख कारण आजही कायम आहेत.

जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यात अपघातांची संख्या ३३ हजारांहून अधिक आहे. म्हणजेच दररोज सरासरी ९० हून अधिक अपघात होत आहेत. मृत्यूंची संख्या किंचित घटल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात अनेक अपघातांतील मृतांची नोंद उशिरा किंवा वेगळ्या श्रेणीत केली जात असल्याची तक्रार पोलीस आणि आरोग्य यंत्रणांतील सूत्रांकडूनच पुढे येत आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मृत्यू कमी झाल्याचे आकडे दाखवले जातात; मात्र प्रत्यक्ष प्रवासात वेगमर्यादा पाळणारे वाहनचालक अपवाद ठरतात. ओव्हरलोड ट्रक, अचानक थांबणारी वाहने, अपुरी साइनबोर्ड व्यवस्था आणि रात्रीची तोकडी प्रकाशयोजना आजही अपघातांना आमंत्रण देत आहेत. अनेक किरकोळ अपघातांची नोंदच होत नाही.

## ठाकरे बंधूंची युती आज जाहीर; राज्याची दिशा ठरवणारी निवडणूक

# मुंबई मनपाच्या लोण्यासाठी बोके एकत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई महापालिका ही केवळ देशातील सर्वात मोठीच नव्हे, तर आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक सक्षम स्थानिक स्वराज्य संस्था मानली जाते. सुमारे ४० ते ५० हजार कोटी रुपयांहून अधिक वार्षिक अर्थसंकल्प असलेली ही महापालिका कोणाच्या ताब्यात जाते, यावर मुंबईसोबतच महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा ठरते. त्यामुळेच आगामी मुंबई मनपा निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

मुंबई महापालिकेत सध्या २२७ नगरसेवकांची संख्या आहे. बहुमतासाठी किमान ११४ जागा आवश्यक आहेत. २०१७ च्या मागील निवडणुकीत शिवसेनेला ८४ जागा, भाजपला ८२, काँग्रेसला ३१, राष्ट्रवादी काँग्रेसला ९, तर मनसेला ७ जागा मिळाल्या होत्या. कोणालाही स्पष्ट बहुमत न मिळाल्याने शिवसेनेने भाजपच्या बाह्य पाठिंब्यावर महापौरपद आणि सत्ता कायम ठेवली होती. या आकड्यांवरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे मुंबईत सत्ता मिळवण्यासाठी एकट्या पक्षाला बहुमत मिळवणे कठीण आहे. त्यामुळे युती आणि मतांचे एकत्रीकरण हा निर्णायक घटक ठरतो.

शिवसेना १९९७ पासून मुंबई महापालिकेत सत्तेत आहे. त्या वर्षी शिवसेना-भाजप युतीने पहिल्यांदा काँग्रेसकडून सत्ता काबीज केली. त्यानंतर २००२, २००७, २०१२ आणि २०१७ या सलग निवडणुकांमध्ये शिवसेनेने सत्ता टिकवून ठेवली. म्हणजेच जवळपास तीन दशके मुंबई महापालिकेवर शिवसेनेचा प्रभाव राहिला आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईला शिवसेनेचा बालेकिल्ला मानले जाते. मात्र, २०२२ नंतर झालेली पक्षफूट, शिंदे गटाची निर्मिती आणि भाजपची वाढती ताकद यामुळे हा बालेकिल्ला पहिल्यांदाच गंभीर आव्हानासमोर उभा राहिला आहे. या बदललेल्या राजकीय परिस्थितीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती ही भावनिक पुनर्मिलनापेक्षा राजकीय अपरिहार्यता अधिक आहे. मराठी मतांचे विभाजन हेच शिवसेनेच्या सत्तेसमोरील सर्वात मोठे संकट राहिले आहे.

मनसे स्वतंत्र लढली, तर मराठी मतांचे तुकडे होतात आणि त्याचा थेट फायदा भाजप किंवा महायुतीला होतो, हे मागील निवडणुकांतून स्पष्ट झाले आहे. म्हणूनच, मुंबईत किमान एकगठ्ठा मराठी मतांसाठी दोन्ही ठाकरे एकत्र येत असल्याचे दिसते.

ठाकरे बंधूंच्या युतीला ११४ चा आकडा गाठता आला नाही, तर सत्ता स्थापन करण्यासाठी इतर पक्षांवर अवलंबून राहावे लागेल. काँग्रेसने स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतल्यास दलित आणि मुस्लिम मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे. ही मतं शिवसेनेच्या पारंपरिक विजयात महत्त्वाची ठरत आली आहेत. बहुमत न मिळाल्यास भाजप-शिंदे गटाला महापालिकेवर दावा सांगण्याची संधी मिळेल. शिवसेनेचा १९९७ पासूनचा सत्तेचा प्रवास तुटण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे.


मुंबई मनपात ठाकरे बंधू यशस्वी ठरले, तर मराठी अस्मितेचे राजकारण पुन्हा केंद्रस्थानी येईल. अन्यथा, मुंबईसारखी आर्थिक राजधानी हातातून गेल्यास उद्धव ठाकरे गटाच्या राज्यस्तरीय राजकारणावरही त्याचे दीर्घकालीन खोल परिणाम होतील.

## पाकिस्तानी नेत्याची दर्पोक्ती

### बांगलादेशावर हल्ला झाल्यास प्रत्युत्तर देऊ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बांगलादेश आणि भारत यांच्यातील तणावपूर्ण संबंधांमध्ये, एका पाकिस्तानी नेत्याने अलीकडेच भारताविरुद्ध विष ओकले आहे. पाकिस्तानी नेत्याच्या शब्दांवरून हे स्पष्ट होते की बांगलादेशातील बिघडत्या परिस्थितीचा फायदा पाकिस्तान घेण्याच्या तयारीत आहे. एका व्हिडिओमध्ये, शाहबाज शरीफ यांच्या पक्षाच्या, पाकिस्तान मुस्लिम लीग (पीएमएल) नेते कामरान सईद उस्मानी यांनी भारताला धमकी दिली आहे की, बांगलादेशावर कोणताही हल्ला झाल्यास पाकिस्तानचे सैन्य आणि क्षेपणास्त्रे प्रत्युत्तर देतील.



बांगलादेशात नुकत्याच मारल्या गेलेला विद्यार्थी नेता उस्मान हादीच्या हौतात्म्याने मुस्लिमांना प्रेरणा दिली आहे, असे कामरान सईद उस्मानीने एका निवेदनात म्हटले आहे. तो म्हणाला, उस्मान हादी हा एक नेता होता, जो म्हणाला की तो बांगलादेशला कोणाचाही गुलाम बनू देणार नाही. पाकिस्तान आणि बांगलादेशमधील प्रत्येक मूल उस्मान हादी आहे, असेही त्याने म्हटले आहे.

पाकिस्तानी नेता म्हणाला, मी आमच्या बांगलादेशी बंधूभगिनींना सांगू इच्छितो की आम्ही तुमच्यासोबत आहोत. पाकिस्तानी जनता तुमच्यासोबत आहे. जर कोणी बांगलादेशावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला तर पाकिस्तान तुमच्यासोबत उभा आहे. कोणी बांगलादेशाच्या स्वायत्ततेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर पाकिस्तान तुमच्यासोबत उभा राहील, अशी वल्गनाही त्याने केली आहे. कामरान सईद उस्मानी याने भारताला धमकी देत म्हटले आहे की, आता कोणी बांगलादेशकडे पाहिले तर पाकिस्तानी जनता, पाकिस्तानी सैन्य आणि क्षेपणास्त्रे तुमच्यापासून दूर नाहीत. पाकिस्तान आणि बांगलादेशने एकत्र येण्याची गरज आहे, असेही तो म्हणाला आहे.

## श्रींच्या दर्शनाशिवाय महापालिका प्रचाराचा नारळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील कसबा गणपती मंदिर तीन आठवड्यांसाठी भक्तांसाठी बंद राहणार असल्याने शहरातील निवडणूक तयारीत अनपेक्षित वळण आले आहे. पुण्याच्या राजकीय संस्कृतीत कसबा गणपतीला भेट देणे, ही निव्वळ धार्मिक प्रथा नाही, तर प्रचाराचा तो शुभारंभ मानला जातो.



श्री कसबा गणपती देवस्थान ट्रस्टने स्पष्ट केले आहे की, शेंदूराचा जाड थर काढण्यासाठीची संवेदनशील प्रक्रिया १५ डिसेंबरपासून सुरू आहे. या संवर्धन प्रक्रियेत प्राचीन स्वयंभू मूर्तीची काळजीपूर्वक जतन केली जाणार आहे. मंदिर १४ डिसेंबर रात्री १०.३० पासून भक्तांसाठी बंद ठेवण्यात आले आहे आणि अंदाजे तीन आठवडे बंद राहणार आहे.

राजकीय इच्छुक उमेदवार, विशेषत: कसबा, शिवाजीनगर आणि जुन्या शहरातील भागातून येणारे, पारंपरिक भेट देण्याचे नियोजन करत होते. आता मंदिर बंद असल्याने काही उमेदवारांनी सार्वजनिक प्रचार पुढे ढकलण्याचा विचार सुरू केला आहे. कसबा गणपतीसारखी ऐतिहासिक आणि नागरिकांशी जोडलेली महत्त्वाची जागा दुसरी कुठेही नाही. कसबा गणपती हा फक्त देव नाही; हा पुण्याचा राजकीय प्रारंभ बिंदू आहे. त्या आशीर्वादाशिवाय प्रचाराची सुरुवात अपूर्ण वाटते. ट्रस्टच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, ही प्रक्रिया अत्यंत संवेदनशील आणि मूर्तीच्या जतनासाठी आवश्यक आहे. या कालावधीत कोणालाही विशेष प्रवेश मिळणार नाही.

## पुरंदर विमानतळ विकासाचे 'इंजिन'

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळामुळे पुणे आणि परिसरातील औद्योगिक विकासाला गती मिळणार असून हा प्रकल्प केवळ प्रवासी नव्हे तर कार्गो विमानतळ म्हणूनही महत्त्वाचा ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे पुण्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात किमान दोन टक्के वाढ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.




पुरंदर विमानतळासाठी बाधित सात गावांतील प्रतिनिधींशी मुख्यमंत्र्यांनी आज संवाद साधला. यावेळी भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर देण्याचा विचार, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत प्राधान्य, तसेच कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

भूसंपादनासाठी रेडी रेकनरऐवजी वाटाघाटीद्वारे दर ठरविण्यात येणार असून पुनर्वसनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. एरोसिटी प्रकल्पात टीडीआरसह सर्व लाभ देण्यात येतील. प्रकल्पबाधितांना विशेष प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विमानतळ परिसरात छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार असून, प्रकल्पाशी संबंधित जुन्या आंदोलनांतील गुन्हे मागे घेण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या संवादावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती दिली.

## सावित्रीबाई फुले-संत सावता महाराज स्मारक: आदेश आहेत, पण काम मागे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व संत शिरोमणी सावता महाराज यांच्या स्मारकांच्या विकासासाठी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी तात्काळ भूसंपादन पूर्ण करण्याचे आदेश दिले. मंत्रालयात आढावा बैठक झाली, अधिकारी उपस्थित होते, तरी प्रत्यक्ष जमीनीवर कामाची गती अजूनही मंदावलेली दिसते.

सातारा जिल्ह्यातील नायगावमध्ये फुले स्मारकासाठी जमीन संपादित करण्याचे निर्देश असून, सोलापूर जिल्ह्यातील अरणमध्ये सावता महाराज स्मारकासाठीही भूसंपादन व पायाभूत सुविधा तत्काळ राबवाव्यात, असे सांगितले गेले. परंतु स्थानिक ग्रामस्थ आणि प्रकल्प समितीचे सदस्य म्हणतात की, अधिकारी मार्गदर्शनात ढील देतात आणि निधी उपलब्धतेत उशीर होतो. यामुळे स्मारक उभारणीला वेळेत सुरुवात होऊ शकलेली नाही.

"आदेश आणि आकडेवारी असली तरी प्रत्यक्ष राबवणूक मागे आहे. कामाची गती मंद असल्याने सामाजिक-सांस्कृतिक वारसा जपण्याच्या उद्देशाला धोका निर्माण होत आहे." मंत्री गोरे स्मारक भव्य आणि प्रेरणादायी असावे असे सांगतात, पण जमीनीवर अडचणी दूर न करता कार्यादेश देणे आणि प्रकल्प राबवणे हे प्रशासनासाठी मोठे आव्हान बनले आहे. विलंबामुळे कामाची गुणवत्ता आणि वेळापत्रक दोन्ही धोक्यात आहेत. ग्राउंड रिपोर्ट स्पष्ट करतो की, आदेश असूनही भूसंपादन आणि प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रशासनाच्या ढिलाईमुळे मागे आहे.

## भारतीयांकडून बर्गर, पिझ्झा आणि डोसा यांनाही वाढती मागणी

# खवैय्यांनी फस्त केल्या ९.३ कोटी बिर्याणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : २०२५ मध्ये भारतीयांच्या ताटात नेमकं काय वाढलं? ऑनलाइन अन्न वितरणाच्या वाढत्या वापरातून देशाची बदलती खाद्यसंस्कृती समोर आली आहे. स्विगीच्या 'हाऊ इंडिया स्विग्ड' अहवालातून लोकप्रिय पदार्थ, प्रादेशिक चवी आणि खाण्याच्या सवयींचे रंजक चित्र स्पष्ट होते. यावर्षी बिर्याणीपासून जागतिक पदार्थांपर्यंत सर्वांचीच चलती पाहायला मिळाली, भारतीय शहरांमध्ये मोठ्या.**



गेलं वर्ष अन्नप्रेमींसाठी खास ठरलं. घरबसल्या जेवणाचा आनंद देणाऱ्या ऑनलाइन अन्न वितरण सेवांनी भारतीयांच्या खाद्यसंस्कृतीचा नवा नकाशा समोर आणला. या पार्श्वभूमीवर स्विगीने प्रसिद्ध केलेल्या 'हाऊ इंडिया स्विग्ड' या अहवालातून २०२५ मधील भारतीयांच्या खाण्यापिण्याच्या सवयींचे रंजक चित्र उलगडले आहे.

या अहवालानुसार, बिर्याणीने पुन्हा एकदा भारतीयांच्या ताटावर आपले वर्चस्व सिद्ध केले. वर्षभरात तब्बल ९.३ कोटी बिर्याणीच्या ऑर्डर नोंदवण्यात आल्या. त्याखालोखाल बर्गर, पिझ्झा आणि डोसा या पदार्थांनीही अन्नप्रेमींच्या पसंतीची यादी गाजवली. बर्गरच्या ४.४२ कोटी, पिझ्झाच्या ४.०१ कोटी, तर डोसाच्या २.६२ कोटी ऑर्डर झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, फास्ट फूडसोबतच स्थानिक आणि पारंपरिक पदार्थांकडेही ग्राहकांचा ओढा वाढताना दिसतो. पहाडी खाद्यपदार्थांच्या मागणीत तब्बल नऊपट वाढ झाली असून, मलबार, राजस्थानी, मालवणी आणि इतर प्रादेशिक पदार्थांच्या ऑर्डरमध्ये गेल्या वर्षभरात जवळपास दुप्पट वाढ झाली आहे.

यावरून भारतीयांना आपल्या मातीतले पदार्थ अजूनही तितकेच प्रिय असल्याचे स्पष्ट होते.

खाण्याच्या वेळांबाबतही अहवालात रंजक निरीक्षण नोंदवले आहे. रात्रीच्या जेवणाच्या ऑर्डर्स दुपारच्या जेवणाच्या तुलनेत सुमारे ३२ टक्क्यांनी अधिक असल्याचे समोर आले आहे. म्हणजेच, दिवसाचा शेवट चविष्ट जेवणाने करण्याकडे ग्राहकांचा कल अधिक आहे.

भारतीय चवींबरोबरच जागतिक पाककृतींनाही चांगलीच पसंती मिळाली. मेक्सिकन खाद्यपदार्थांच्या १.६ कोटी, तिबेटी पदार्थांच्या १.२ कोटींपेक्षा अधिक, तर कोरियन पदार्थांच्या सुमारे ४७ लाख ऑर्डर नोंदवण्यात आल्या. यावरून भारतीयांचा स्वाद आता जागतिक पातळीवर विस्तारत असल्याचेही स्पष्ट होते. एकूणच, २०२५ हे वर्ष भारतीय अन्नप्रेमींसाठी विविध चवी, परंपरा आणि नव्या प्रयोगांचे ठरले, असे चित्र स्विगीच्या अहवालातून समोर आले आहे.

## विशेष संपादकीय

### आकड्यांची सत्ता, वास्तवाचा पराभव!

**नगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर होताच अनेक शहरांत आणि गावांत गुलाल उधळला गेला, घोषणाबाजी झाली, फुगड्या खेळल्या गेल्या. लोकशाहीचा उत्सव साजरा होणे गैर नाही; पण या आनंदाला ज्या पद्धतीने उधळपट्टीचे, डिवचण्याचे आणि वैर वाढवणारे स्वरूप आले, ते मात्र कौतुकास्पद ठरत नाही. विशेषतः पराभूत उमेदवारांच्या घरांसमोर जाऊन टोमणे मारणे, 'पडेल' उमेदवारांना डिवचणे, हे अतिउत्साही कार्यकर्त्यांनी केलेले कृत्य लोकशाहीच्या संस्कृतीला शोभणारे नाही.**

निवडणुका जिंकल्या, आकडे मिळवले आणि लगेच ढोल वाजवला—"आम्हीच बरोबर!" ही भाजपची आजची राजकीय ओळख झाली आहे. लोकांनी काय दिलं, कशासाठी दिलं, किती लोकांनी विरोध केला. हे प्रश्न गैरसोयीचे ठरवून आकड्यांच्या जोरावर वास्तव गाडून टाकण्याची कला भाजपने कमालीची आत्मसात केली आहे. लोकशाही आकड्यांवर चालते खरी, पण जेव्हा आकडेच सत्य ठरवू लागतात, तेव्हा वास्तवाचा गळा कुठे दाबला जातो, हा प्रश्न विचारायलाच हवा. भाजपचे राजकारण आता विचारांचे राहिलेले नाही; ते पूर्णपणे आकडेमोडीचे झाले आहे. कुठे मतांची टक्केवारी लपवायची, कुठे जागांचा डंका वाजवायचा, कुठे मित्रपक्षांचे यश आपल्याच खात्यात जमा करायचे—हे गणित भाजप इतक्या निर्लज्जपणे मांडते की शंका घेणाऱ्यालाच देशद्रोही ठरवले जाते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पूर्ण बहुमत मिळाले. पण त्या विजयामागील वास्तव काय होते? देशातील अवघ्या ३१ टक्के मतदारांनी भाजपला मत दिले होते. उरलेले ६९ टक्के मतदार भाजपविरोधात होते. पण या अस्वस्थ वास्तवावर कधी चर्चा झाली का? नाही. कारण आकड्यांनी सत्ता दिली आणि सत्ता मिळाली की वास्तव अप्रासंगिक ठरते—ही भाजपची सोयीची भूमिका. उत्तर प्रदेशात हा खेळ अधिक उघड झाला. २०१७ आणि २०२२ मध्ये भाजपला सुमारे ४० टक्के मते मिळाली. पण जागा मिळाल्या तीनशेच्या वर. समाजवादी, बसपा आणि काँग्रेस यांची मते फुटली, भाजप जिंकला. हा विजय भाजपच्या लोकप्रियतेचा होता की विरोधकांच्या अपयशाचा, हा प्रश्नच विचारला गेला नाही. आकड्यांच्या नशेत वास्तवावर माती टाकली गेली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत तर भाजपने कळस गाठला. ४५ टक्के मते मिळाली आणि उरलेले ५५ टक्के देशातून गायब झाले! "संपूर्ण देश आमच्यासोबत आहे" असा दावा केला गेला. खरं तर निम्म्याहून अधिक देश भाजपविरोधात उभा होता. पण आकड्यांनी दिलेला अहंकार इतका प्रबळ होता की विरोध करणारे आकड्यांतच गडप झाले. महाराष्ट्रात तर लोकशाहीचा मुखवटा काढून टाकणारी आकडेमोड झाली. २०१९ चा जनादेश बाजूला ठेवून आमदार फोडले गेले, सत्ता उभी केली गेली आणि त्यालाच "लोकशाही मार्ग" म्हणण्यात आले. जनतेच्या मतांपेक्षा आमदारांची संख्या महत्त्वाची ठरली. "आमच्याकडे बहुमत आहे" एवढे एकच वाक्य सगळ्या नैतिक प्रश्नांवर भारी ठरले. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत तोच खेळ सुरू आहे. भाजपच्या चिन्हावर निवडून आलेले उमेदवार कोण आहेत? कालपर्यंत काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेत असलेले नेते. त्यांच्या व्यक्तिगत प्रभावाने मिळालेले विजय भाजपच्या खात्यात जमा केले जातात. भाजपचा मूळ कार्यकर्ता मात्र झेंडे उचलत बसतो. पण आकडेमोडीत त्याची किंमत शून्य असते. ही आकड्यांची सत्ता लोकशाहीसाठी घातक आहे. कारण येथे विचार, निष्ठा, मूल्य यांना काहीच स्थान उरत नाही. "आकडे आमच्याकडे आहेत" हे एकच वाक्य सत्तेचे प्रमाणपत्र ठरते. आकड्यांच्या आडून वास्तव लपवले जाते आणि प्रश्न विचारणाऱ्यांना गप्प केले जाते. इतिहास भाजपला सावध करतो. काँग्रेसनेही एकेकाळी हाच मार्ग चालला—बहुमत, आकडे, सत्ता... आणि शेवटी संघटन कोसळले. भाजप आज अधिक आक्रमक, अधिक निर्दय पद्धतीने तोच प्रयोग करत आहे. फरक एवढाच की आज आकड्यांचा गजर इतका मोठा आहे की वास्तवाचा आवाज ऐकू येत नाही. पण वास्तव कधीच कायम गप्प राहत नाही. आज आकडेमोड जिंकतेय, पण उद्या प्रश्न उभे राहतील. लोकशाही केवळ आकड्यांचा खेळ नाही; ती लोकांच्या विश्वासावर उभी असते. तो विश्वास जर आकड्यांच्या गर्जनेत हरवला, तर विजयाचा हा माज फार काळ टिकणार नाही.

**- संपादक, दै. राज्य लोकतंत्र, पुणे**

# सिद्धांतावर विश्वास नाही, फक्त विजयाची भूक!

■ **डॉ. अशोक बालगुडे**

**पुणे : कोणतीही निवडणूक रणांगणासारखीच असते; येथे सिद्धांत किंवा नीतीमत्ता अपुरे ठरतात. जिंकण्याची भूक, कार्यकर्त्यांचा उत्साह, आणि नेतृत्वाची सजगता हेच अंतिम निर्णायक ठरतात. २०१४ पासून २०१९ पर्यंत महाराष्ट्रातील विधानसभा, महापालिका आणि नगरपंचायतींच्या निकालांचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट दिसते. विजिगिषू मानसिकतेने सत्ताधारी पक्षाने स्थानिक रणांगण जिंकले, तर विरोधकांच्या पराभूत मानसिकतेमुळे त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.**



राज्यातील महापालिका आणि नगरपंचायतींच्या निकालांवरून स्पष्ट झाले आहे की स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रभुत्व ठेवणारी सत्ताच पुढे टिकते. महाविकास आघाडीतील अनेक विरोधकांनी कार्यकर्त्यांवर अवलंबून राहिले, प्रचारावर लक्ष दिले नाही आणि स्थानिक रणनीती तयार केली नाही; परिणामी भाजपला विजयाचा लाभ मिळाला.

भाजपची रणनीती लक्षात घेतल्यास स्पष्ट होते की कार्यकर्त्यांचा सतत सहभाग, स्थानिक नेत्यांची सक्रियता, आणि नेतृत्वाची सजगता हे विजयाची गुरुकिल्ली ठरले.

नगरपालिकांमध्ये १२९ नगराध्यक्ष निवडून आले, तर नगरसेवकांची संख्या १६०१ वरून ३३२५ वर पोहोचली. ही आकडेवारी फक्त विरोधकांच्या अपयशाचे नाही, तर भाजपच्या जिंकण्याच्या भुकेचे थेट परिणाम आहेत. जुन्या संदर्भांकडे पाहिले तर, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने विदर्भ, मराठवाडा, कोकणात कार्यकर्त्यांच्या अथक कष्टाने पाय रोवले. २०१७ मधील महापालिका निवडणुकीत शहरांमध्ये भाजपला काही प्रमाणात झटका मिळाला, पण ग्रामीण भागात काँग्रेस-राष्ट्रवादीची पकड होती. या अंतराला पाटण्यासाठी भाजपने २०१९ मध्ये ग्रामपातळीवर संघटनात्मक विस्तार करून स्थानिक नेत्यांना सक्रिय करून रणनीती ठरवली आणि विजयाची दिशा निश्चित केली.

विरोधकांच्या मनोवृत्तीवरही थेट परिणाम झाला. महाविकास आघाडीतील नेत्यांनी कार्यकर्त्यांना सोडून बाहेरून निर्देश दिले. संवादाचा अभाव, तयारीचा अभाव आणि कार्यकर्त्यांचा विसर हे पराभवाचे मुख्य कारण ठरले. जिथे विरोधकांनी सक्रिय सहभाग घेतला नाही, तिथे भाजपने स्थानिक नेत्यांचा उपयोग करून विरोधकांची एकसंधता मोडली. धर्माबाद, विदर्भ, रायगड, कोकण आणि पुणे जिल्ह्यांमध्ये हे स्पष्ट दिसले.

महायुतीच्या तीनही पक्षांनी (भाजप, शिंदे गटाची शिवसेना, राष्ट्रवादी) स्थानिक रणांगणात आपली ताकद दाखवली. जिथे निवडणूक युती नव्हती, तिथे महायुतीतील पक्षांनी स्वतंत्र लढत घेतली; परिणामी ७५ टक्के जागा मिळाल्या. भाजपा, शिंदे गट आणि अजित पवार यांच्या पक्षांनी एकत्रितपणे स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रभुत्व गाजवले.

सिंधुदुर्ग, सातारा, धाराशिव, पुणे, नाशिक, पालघर, ठाणे या जिल्ह्यांमध्ये भाजप आणि शिंदे गट एकमेकांविरुद्ध लढले; तरी महायुतीची एकूण कामगिरी प्रभावी राहिली. यामुळे स्थानिक निवडणुकीत महाविकास आघाडीला अपयश आले आणि महायुतीचे मनोबल वाढले.

भाजपने स्थानिक नेतृत्वाचा प्रभाव स्पष्ट केला. धर्माबाद, रायगड, नागपूर, विदर्भातील जिल्ह्यांमध्ये कार्यकर्त्यांना सक्रिय करून स्थानिक नेत्यांना स्वबळावर विजय साधण्याची संधी दिली. विरोधकांनी मात्र कार्यकर्त्यांवर अवलंबून राहिले आणि संवाद न ठेवल्यामुळे त्यांचा प्रभाव कमी झाला. कार्यकर्त्यांचा सहभाग आणि नेतृत्वाची सजगता ही जिंकण्याची भूक साधण्यासाठी मुख्य घटक ठरली.

भाजप कार्यकर्त्यांच्या नाराजीचा मुद्दाही गंभीर आहे. अनेक ठिकाणी भाजपमध्ये इनकमिंग म्हणजे बाहेरून आलेले माजी आमदार, नेते यांना तिकीट देणे या कारणास्तव मूळ कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. सोलापूर, सासवड, मोहोळ, पुणे जिल्ह्यातील अनेक नगरपालिकांमध्ये स्थानिक कार्यकर्त्यांनी विरोध दर्शविला. कार्यकर्त्यांचे आंदोलन, प्रचार साहित्य फेकणे, संपर्क कार्यालय बंद करणे यासारख्या घटना घडल्या. या सगळ्यांमुळे विरोधकांपेक्षा कार्यकर्त्यांचा सहभाग अधिक निर्णायक ठरला.

विरोधकांच्या पराभवाची आणखी एक कारणे म्हणजे घराणेशाही आणि नीतीमत्तेची अतिरेकी अडचण. धर्माबाद नगरपालिकेत आमदारांच्या कुटुंबातील सहा जणांना उमेदवारी देण्यात आली, तरी मतदारांनी सुविचारित निर्णय घेतला. विदर्भात काँग्रेसला दुसरा क्रमांक मिळाला, पण अनेक भागांत अजूनही भाजपचाच पर्याय आहे. स्थानिक निवडणुकीत नीतीमत्ता म्हणजे सिद्धांत आहे; जिंकण्याची भूक म्हणजे वास्तविक रणसंग्राम. निवडणुकीचे आकडेवारी, स्थानिक रणनीती, कार्यकर्त्यांचा सहभाग, नेतृत्वाची सजगता या सर्व गोष्टी दर्शवतात की जिंकण्याची इच्छाशक्तीच अंतिम निर्णय ठरवते. २०१४–२०१९ दरम्यानच्या निकालांचा अभ्यास दर्शवितो की जिथे कार्यकर्त्यांचा सहभाग उच्च होता, तिथे भाजपने स्वबळावर विजय मिळवला. विरोधकांनी सक्रिय सहभाग घेतला नाही, तिथे भाजपने स्थानिक नेत्यांचा वापर करून विरोधकांची एकसंधता मोडली. महाविकास आघाडीतील काही शहरांमध्ये युती असूनही स्थानिक कार्यकर्त्यांनी ठराविक ताकद दाखवली. महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागात भाजपने आपली ताकद विस्तारली, त्यामुळे २०२९ मधील निवडणुकांमध्ये स्थानिक विजयाचा परिणाम स्पष्ट दिसणार आहे.

राज्यातील महापालिका आणि नगरपंचायतींच्या निकालातून हे स्पष्ट झाले आहे की विजिगिषू मानसिकतेनेच सत्ताधारी पक्षावर विजय मिळवला, विरोधकांची पराभूत मानसिकता त्यांच्या पराभवाची मूळ कारणे ठरली. नीतीमत्ता म्हणजे सिद्धांत, जिंकण्याची भूक म्हणजे वास्तविक रणसंग्राम. आगामी २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये स्थानिक विजयाचे परिणाम स्पष्ट दिसणार आहेत. स्थानिक रणांगणातील ताकद, रणनीती आणि कार्यकर्त्यांचा सहभाग हेच भविष्यकाळातील राजकीय यश ठरवतील. कार्यकर्त्यांचा उत्साह, नेतृत्वाची सजगता आणि जिंकण्याची भूक हेच विजयाचे प्रमुख घटक आहेत, आणि विरोधक अजूनही पराभूत मानसिकतेत अडकले आहेत.

### स्थानिक रणांगणच सत्ता टिकविते

निवडणूक ही रणांगणच असते; येथे नीतीमत्ता वा सिद्धांत नव्हे, तर जिंकण्याची तीव्र भूक निर्णायक ठरते. २०१४ ते २०१९ दरम्यानच्या महाराष्ट्रातील विधानसभा, महापालिका आणि नगरपंचायत निवडणुकांचा अभ्यास केला असता हे स्पष्ट होते. भाजपने कार्यकर्त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग, स्थानिक नेतृत्वाची सक्रियता आणि संघटनात्मक ताकद यावर भर देत स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रभुत्व मिळवले. याउलट विरोधक संवादहीनता, तयारीचा अभाव आणि पराभूत मानसिकतेमुळे पिछाडीवर राहिले. स्थानिक रणांगण जिंकणारीच सत्ता टिकते, हे या निकालांनी अधोरेखित केले.

# शरद पवारांना आणखी एक मोठा धक्का

## शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचा राजीनामा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** आगामी पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (शरद पवार गट) अंतर्गत अस्वस्थता वाढत असतानाच पक्षाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे पुणे शहराध्यक्ष व माजी महापौर प्रशांत जगताप यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली असून, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी करण्यास केलेला ठाम विरोधच त्यांच्या राजीनाम्याचे प्रमुख कारण मानले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पुणे शहराध्यक्ष व माजी महापौर प्रशांत जगताप यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून, हा राजीनामा त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे सोमवारी दिल्याची चर्चा आहे. मात्र, जगताप यांची पुढील राजकीय भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. ते काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात असून, याबाबत त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

आगामी महापालिका निवडणुकीत पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आला आहे. यासाठी शरद पवार गटाकडून एक समन्वय समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीत माजी खासदार वंदना चव्हाण, प्रवक्ते अंकुश काकडे आणि स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विशाल तांबे यांचा समावेश आहे. या समितीने अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी करण्याची जाहीर भूमिका मांडली होती.या भूमिकेला प्रशांत जगताप यांनी सुरुवातीपासूनच तीव्र विरोध दर्शविला होता. अजित पवार यांच्यासोबत आघाडी झाल्यास राजकारणातून संन्यास घेईन, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी जाहीरपणे मांडली होती. यासंदर्भात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली होती. मात्र, पक्षातील घडामोडी पाहता जगताप यांचा विरोध दुर्लक्षित झाल्याची चर्चा आहे.

दरम्यान, जगताप यांच्या राजीनाम्यामुळे शरद पवार गटाला पुण्यात आणखी एक मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. यापूर्वी वारजे परिसरातील माजी नगरसेवक सचिन दोडके, माजी आमदार रमेश वांजळे यांच्या कन्या सायली वांजळे तसेच वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांचे पुत्र सुरेंद्र यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) सध्या गळतीच्या फेऱ्यात सापडल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

# लॅपटॉप भाड्याच्या नावाखाली एक कोटी २४ लाखांचा घोटाळा!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** खासगी कंपनीसाठी लॅपटॉप भाडेतत्त्वावर घेण्याचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची तब्बल १ कोटी २४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यात उघडकीस आला आहे. दरमहा एका लॅपटॉपसाठी १५ ते २५ हजार रुपयांचे भाडे देण्याचे आश्वासन देत ५३४ लॅपटॉप ताब्यात घेतल्यानंतर आरोपी दाम्पत्याने ना भाडे दिले, ना लॅपटॉप परत केले. या प्रकरणी आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर शिवाजी पाटेकर आणि नूतन ज्ञानेश्वर पाटेकर अशी गुन्हा दाखल

**५३४ लॅपटॉपसह दाम्पत्य फरार**

करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी सांगितेल की, आरोपीबरोबर फिर्यादी व्यावसायिकाची सप्टेंबर २०२४ मध्ये आरोपींशी ओळख झाली होती. आरोपींनी एका खासगी कंपनीला मोठ्या प्रमाणावर लॅपटॉप भाड्याने आवश्यक असल्याचे सांगून विश्वास संपादन केला. "प्रत्येक लॅपटॉपसाठी दरमहा १५ ते २५ हजार रुपये भाडे मिळेल," असे आमिष दाखवत त्यांनी व्यावसायिकाकडून टप्प्याटप्प्याने एकूण ५३४ लॅपटॉप ताब्यात घेतले. त्यानंतर अनेक महिने उलटूनही आरोपी दाम्पत्याने एकही रुपया भाडे दिले नाही.

# आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर अटकेत

## नाना पेठेतील जमिनीचा बेकायदा ताबा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** नाना पेठेतील एका जमिनीचा ताबा घेऊन त्यावर बेकायदा बांधलेल्या इमारतीतील भाडेकरुंकडून पाच कोटी ४० लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणी आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकरला समर्थ पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी व्यावसायिकाने समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, सूर्यकांत उर्फ बंडू राणोजी आंदेकर (वय ७०, रा. नाना पेठ), मनेष उर्फ मनोज चंद्रकांत वर्देकर (वय ५६, रा. कस्तुरे चौक, गुरुवार पेठ) यांच्याविरुद्ध खंडणी उकळणे, बेकायदा जमीन बळकावणे, अतिक्रमण करणे अशा कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

विकसनासाठी जमिनीचा ताबा सोडण्यासाठी बंडू आंदेकर जमीन मालकाला धमकावत होता. त्याबदल्यात दोन दुकाने किंवा दीड कोटी रुपये, महापालिकेच्या कामासाठी ३० लाख रुपयांची खंडणी आंदेकरने मागितली होती. खंडणी न दिल्यास व्यावसायिकाला जीवे मारण्याची धमकी त्याने दिल्याची फिर्याद व्यावसायिकाने दिली होती.

आयुष कोमकर खून प्रकरणात आंदेकर न्यायालयीन कोठडीत धुळे कारागृहात आहे. त्याला समर्थ पोलिसांनी धुळे कारागृहातून ताब्यात घेऊन विशेष न्यायालयात हजर केले. आंदेकरने भाड्यापोटी पाच कोटी ४० लाख रुपये खंडणी उकळली आहे. या पैशांचा वापर त्याने कसा केला, तसेच अन्य कोण लाभार्थी आहेत का ?, त्याने अशा पद्धतीने आणखी कोणाला धमकावून जमीन बळकाविली आहे का ? यादृष्टीने तपास करायचा आहे. आंदेकरला पोलीस कोठडीत ठेवण्याची विनंती सरकारी वकील अनिल कुंभार यांनी युक्तिवादात केली. आरोपीकडून ॲड. मिथून चव्हाण यांनी बाजू मांडली. न्यायालयाने आंदेकरला शुक्रवारपर्यंत (२६ डिसेंबर) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

माजी नगरसेवक वनराज आांदेकर याचा १ सप्टेंबर रोजी २०२४ रोजी नाना पेठेतील डोके तालीम चौकात पिस्तुलातून गोळीबार करुन खून करण्यात आला. नाना पेठेतील वर्चस्व, तसेच कौटुंबिक मालमत्तेच्या वादातून आंदेकर याचा खून करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी याप्रकरणात सोमनाथ गायकवाड, अनिकेत दुधभाते, वनराज आंदेकरची बहीण संजीवनी, मेहुणे जयंत, गणेश यांच्यासह १६ आरोपींना अटक केली होती. या प्रकरणात पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केली होती.

वनराज आंदेकरच्या खुनाचा बदला घेण्यासाठी गणेशोत्सव विसर्जनाच्या पूर्वसंध्येला ६ सप्टेंबर २०२५ रोजी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करुन खून करण्यात आला होता. याप्रकरणी आंदेकर टोळीचा म्होरक्या सूर्यकांत उर्फ बंडू आंदेकर याच्यासह आरोपींना अटक करण्यात आली होती. आंदेकर टोळीने मासळी बाजारातील व्यावसायिकांकडून खंडणी उकळल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले होते..



# हडपसरमधील शांती ज्युनिअर प्री-स्कूलमध्ये ख्रिसमस साजरा

**पुणे :** महंमदवाडीमधील शांती ज्युनिअर प्री-स्कूल, महमदवाडी येथे वंचित, उपेक्षित मुलांसह शाळेतील विद्यार्थी, पालक आणि नागरिक यांच्या सहभागाने ख्रिसमस सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमास जितेश खरात, युनूस शेख आणि सुनील भुजबळ उपस्थित होते.

डॉ. संजय कोरे यांनी प्रभू येशू ख्रिस्तांच्या जन्माचा आणि ख्रिसमस सणाचा महत्त्वाचा संदेश गोष्टीच्या माध्यमातून सांगितला, तसेच प्रेम, शांती आणि करुणेचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि खेळ सादर करून सणाची आनंददायी वातावरण निर्माण केले. मुलांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शांती ज्युनिअर प्री-स्कूलच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर सरगम पाठक, सुप्रिया भुजबळ, खुशी शेख, नीलिमा खरात, नसीम शेख, प्राजक्ता राऊत, क्षिप्रा रंजन आणि शिरीन खान यांनी केले. उपस्थितांनी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

# प्रा. संदीप चोपडे यांना पीएच.डी.; कुलगुरूंच्या हस्ते सन्मान



■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** एम.जी.एम. विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे पहिले पीएच.डी. पदवीधारक होण्याचा मान हडपसरमधील प्रा. संदीप उत्तम चोपडे यांनी पटकावला आहे. "महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास" या विषयावर त्यांनी संशोधन केले. त्यांना डॉ. रसिका वडाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू प्रा. डॉ. विलास सकपाळ यांच्या हस्ते त्यांना पीएच. डी. नोटिफिकेशन प्रदान करण्यात आले. याप्रसंगी परीक्षा नियंत्रक डॉ. एच. एच. शिंदे, विभागप्रमुख डॉ. जॉन चेल्लीदुराई व इतर मान्यवर उपस्थित होते. संशोधन हे माझ्या कष्टाचे आणि सपोर्ट सिस्टमच्या विश्वासाचे प्रतीक आहे, अशी भावना डॉ. चोपडे यांनी व्यक्त केली.

# पुणे पोलिस आयुक्तांचे पीआरओ प्रवीण घाडगे केले निलंबित

## सेवेतून बडतर्फीची प्रक्रिया सुरू

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार पोलिस कॉन्स्टेबल आणि पीआरओ प्रवीण घाडगे यांना गंभीर अनियमितता व पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या विरोधात सेवेतून बडतर्फ करण्याची विभागीय प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.

गोपनीय चौकशीनंतर हे उघड झाले की प्रवीण घाडगे यांनी पुणे पोलिस आयुक्तांच्या नावाचा गैरवापर करत आंदेकर टोळीशी संबंध असलेल्या बिल्डर अविनाश पवार याला मदत करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच, सहाय्यक पोलिस आयुक्त शंकर खटके यांच्यावर दबाव टाकून जमीन वादाच्या प्रकरणात पवारला मदत मिळावी यासाठी प्रयत्न केला, असे तपासात समोर आले.

पोलिस उपायुक्त निखिल पिंगले यांच्यापर्यंत ही माहिती पोहोचली आणि चौकशीस प्रारंभ झाला. चौकशीत 'स्टॅनली' नावाच्या व्यक्तीने सांगितले की प्रवीण घाडगे यांनी प्रकरण मिटवण्यासाठी २० लाख रुपयांची मागणी केली होती आणि आंदेकर टोळीशी संबंधित पवार यांचे प्रकरण स्वतः हाताळले होते.

पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली आंदेकर टोळीविरोधात कारवाई सुरू असतानाच पोलिस दलातील एका पीआरओने त्या टोळीच्या फायद्यासाठी काम केले असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

यापूर्वीही प्रवीण घाडगे यांच्याविरोधात तक्रारी मिळाल्या होत्या. पीआरओ पदाचा गैरवापर करून सातत्याने अनैतिक व बेकायदेशीर कृत्य करण्याचे धक्कादायक प्रकार उघड झाल्याने अमितेश कुमार यांनी कठोर निर्णय घेत निलंबनाची कारवाई केली आहे. या घटनेमुळे पुणे पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे.

# उच्च सुरक्षा नंबरप्लेट बसविण्यासाठी काउंटडाऊन सुरू!

## पुण्यात १६ लाख वाहनांवर HSRP नाही; अंतिम डेडलाइन ३१ डिसेंबर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** पुण्यात उच्च सुरक्षा नंबरप्लेट (HSRP) बसविण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५ असून, काउंटडाऊन सुरू झाले आहे. शहरातील वाहनधारकांमध्ये अद्याप प्रतिसाद अपेक्षेइतका दिसत नाही. परिवहन विभागाच्या माहितीनुसार, आतापर्यंत फक्त १० लाख वाहनधारकांनी नोंदणी केली, त्यापैकी ८ लाख वाहनांवरच HSRP बसवली गेली आहे. म्हणजेच शहरातील सुमारे १६ लाख वाहनांवर अद्याप सुरक्षा नंबरप्लेट बसवणे बाकी आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, २०१९ एप्रिलपूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर HSRP अनिवार्य आहे, जेणेकरून अपघात किंवा गुन्ह्यातील सहभागी वाहन ओळखणे सोपे होईल. परिवहन विभागाने हे नियम राबविण्यासाठी पाच वेळा मुदतवाढ दिली आहे, मात्र नागरिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही




डिसेंबर महिन्यात फक्त ५० हजार वाहनधारकांनी नोंदणी केली, तर उरलेल्या वाहनांना नंबरप्लेट बसविण्यासाठी पुढील काही महिने लागण्याची शक्यता आहे. शहरातील काही वाहनधारक फिटमेंट सेंटर कमी असल्याचा मुद्दा सांगत होते; मात्र आरटीओच्या सूचनेनुसार केंद्रांचा काही प्रमाणात विस्तार केला गेला. तरीही नागरिकांमध्ये उदासीनता दिसून येत आहे. परिवहन विभाग आता उरलेल्या वाहनधारकांसाठी पुन्हा मुदतवाढ देईल की थेट कारवाई सुरू करेल, हे पाहणे बाकी आहे. अद्याप पुण्यातील सुमारे ६५ टक्के वाहनांना HSRP बसवलेले नाही, ज्यामुळे अंतिम तारखेपूर्वी लांबलचक रांगा व गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे.

वाहनधारकांनी लवकरात लवकर ऑनलाइन नोंदणी करून आणि अधिकृत फिटमेंट सेंटरमध्ये HSRP बसवून नियम पाळणे अत्यावश्यक आहे, अन्यथा कडक कारवाई व दंड टाळता येणार नाही.

# पुण्यातील भाजप इच्छुक बंडखोरीच्या उंबरठ्यावर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** पुण्यात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये काही इच्छुक उमेदवार बंडखोरीच्या उंबरठ्यावर आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) पक्षाने पुण्यातील स्थानिक माजी नगरसेवक आणि इच्छुक उमेदवारांशी संपर्क साधून भाजपच्या नाराज पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण केली आहे.

भाजपने गेल्या आठवड्यात काही माजी राष्ट्रवादी नगरसेवकांना प्रवेश दिला, ज्यामुळे बाणेर-

**अजित पवारांचे राष्ट्रवादी शिलेदार कामाला!**

बालेवाडी-पाषाण, वडगाव धायरी-वडगाव बुद्रुक आणि कळस-धानोरी प्रभागात असलेले स्थानिक भाजप पदाधिकारी नाराज झाले आहेत. माजी नगरसेवक विकास दांगट, सचिन दोडके, सायली वांजळे व बाळासाहेब धनकवडे यांना प्रवेश दिल्यामुळे विरोध निर्माण झाला. त्याचबरोबर पूर्वीच्या राष्ट्रवादी नगरसेविका रोहिणी चिमटे यांना प्रवेश दिल्याने अनुसूचित जमाती महिला प्रवर्गातील जागांवर भाजपमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### घरफोड्यांत साडेतीन लाखांचा ऐवज चोरीला

**पुणे :** सदाशिवपेठ, नवीन शिवणे कोथरुड परिसरात चोरट्यांनी सदनिका आणि प्रिंटींगप्रेसच्या दुकानात चोरी करून चोरट्यांनी तीन लाख ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरी केला आहे. याप्रकरणी, पर्वती आणि अलंकार पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदाशिव पेठेतील एका सदनिकेतून चोरट्यांनी रोकड,चांदीची नानी, तांब्याची पातेली असा ३८ हजार रुपयांचा ऐव चोरी केला. याप्रकरणी ७३ वर्षीय जेष्ठाने फिर्याद दिली आहे. त्यानुसार पर्वती पोलिसांनी चोरट्याच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.फिर्यादींची सदाशिव पेठेतील विजयनगर कॉलनीत सदनिका आहे. दरम्यानच्या काळात त्यांची सदनिका बंद असताना, चोरट्यांनी दरवाजाचा कडीकोयंडा उचकटून चोरी केली आहे. तर दुसरी चोरीची घटना वनदेवी चौक नवीन शिवणे कोथरुड येथील ड्रीम कॅचर या फ्लेक्स प्रिंटगच्या दुकानात घडली आहे.

### संत गाडगेबाबांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन होता : डुंबरे

**ओतूर :** गाडगे महाराज हे विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन जागृत करणारे संत होते.त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी प्राधान्य देण्याचे, बुद्धीचा योग्य वापर करण्याचे आणि आई-वडिलांचा सन्मान करण्याचे आवाहन उद्योजक शिवाजीराव डुंबरे यांनी केले. गाडगे महाराज शिक्षण संकुल ओतूरमध्ये शनिवारी (दि. २०) वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी यशवंत घोडे, शरद शेटे, भानुदास कोकणे, मोहन तांबे, ॲड. जयराम तांबे, अनिल डुंबरे, शिवाजी डुंबरे, सुदर्शन केमिकल्स संचालक, सरपंच डॉ. छाया तांबे, उपसरपंच प्रशांत डुंबर, धनंजय डुंबरे, विशाल तांबे, सचिन घोलप उपस्थित होते. यावेळी नृत्य स्पर्धा, चित्रकला, रांगोळी, विज्ञान प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## ३ कोटी ६७ लाख ७७ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर; आज उर्वरित हप्ता जमा होणार

# भीमाशंकरचा एफआरपीनुसार 3,273 रुपये प्रती मे.टन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर :** दत्तात्रयनगर, पारगावतर्फे अवसरी बु : भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२५-२६ साठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या एफ.आर.पी.नुसार रु. ३,२७३ प्रती मे.टन दर देण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या दोन पंधरवड्यांसाठी अदा करण्यात आलेला प्रथम हप्ता रु. ३,१०० प्रती मे.टन वजा जाता उर्वरित रु. १७३ प्रती मे.टनप्रमाणे एकूण रु. ३ कोटी ६७ लाख ७७ हजार इतकी रक्कम बुधवार (दि. २४ डिसेंबर) रोजी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली जाणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना बेंडे म्हणाले की, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच शासनाच्या निर्णयानुसार मागील हंगामातील साखर उतारा विचारात घेऊन आणि ऊस तोडणी व वाहतूक खर्च वजा करून एफ.आर.पी. निश्चित करण्यात येते. त्यानुसार गाळप हंगाम २०२५-२६ साठी देय एफ.आर.पी. रु. ३,२७२.१४ प्रती मे.टन इतकी येत असून ती रक्कम गोल करून रु. ३,२७३ प्रती मे.टन देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

कारखान्याने यापूर्वी दि. ३० नोव्हेंबरअखेर गाळप झालेल्या ऊसासाठी प्रथम हप्ता म्हणून रु. ३,१०० प्रती मे.टनप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा केली होती. त्यावेळी रक्कम उपलब्धतेनुसार एफ.आर.पी.ची उर्वरित रक्कम नंतर अदा करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार आता इथेनॉल विक्रीतून मिळालेली रक्कम, इथेनॉलवरील व्याज परतावा तसेच आयकर परतावा कारखान्याच्या खात्यात जमा झाल्याने एफ.आर.पी.चे उर्वरित पेमेंट देणे शक्य झाले आहे.

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये दि. ३० नोव्हेंबरअखेर एकूण २ लाख १२ हजार ५८६ मे.टन ऊस गाळप करण्यात आले असून, त्यावर रु. १७३ प्रती मे.टनप्रमाणे उर्वरित रक्कम रु. ३ कोटी ६७ लाख ७७ हजार इतकी होते. ही संपूर्ण रक्कम बुधवार (दि. २४ डिसेंबर) रोजी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट वर्ग करण्यात येणार आहे. यापुढे गाळप होणाऱ्या प्रत्येक पंधरवड्याचे ऊस पेमेंट एफ.आर.पी.नुसार रु. ३,२७३ प्रती मे.टन दराने नियमितपणे देण्यात येणार असल्याचेही बेंडे यांनी स्पष्ट केले. भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने आतापर्यंत कार्यक्षेत्र व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नेहमीच वेळेत व समाधानकारक दर दिलेला आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला उत्पादित केलेला ऊस भीमाशंकर कारखान्यास गाळपास देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# पत्नीच्या डोक्यात प्रहार करून पतीने केली हत्या

## इंदापूर तालुका हादरला....

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पुणे : शेळगाव (ता. इंदापूर) परिसरात मंगळवार (दि. २३ डिसेंबर) पहाटे एका ३५ वर्षीय विवाहित महिलेचा क्रूर खून झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मृत महिलेचे नाव मनीषा मल्हारी खोमणे असून, संशयित आरोपी त्यांच्या पती मल्हारी उर्फ बापू खोमणे याच्यावर आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, पहाटे साडेपाचच्या सुमारास मनीषा अंघोळीला जात असताना पतीने पाठीमागून डोक्यात जोरदार वार केला. या हल्ल्यात ती जागीच कोसळून मृत्यूमुखी पडली. त्यानंतर तिला इंदापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले गेले, परंतु डॉक्टरांनी तिचा मृत्यू नोंदवला.

घटनेची माहिती मिळताच वालचंदनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी पोहचले. पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे, पोलीस उपनिरीक्षक रथीलाल चौधर, हवालदार दादासाहेब डोईफोडे आणि पोलीस कर्मचारी गुलाब पाटील यांनी पाहणी केली आणि पंचनामा केला. संशयित पतीवर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपी सध्या फरार असून, त्याच्या शोधासाठी वालचंदनगर पोलिसांच्या पथकांनी माळेगाव, जेजुरी, नातेपुते आणि आसपासच्या परिसरात तपास सुरू केला आहे. पोलिसांचा विश्वास आहे की लवकरच त्याला अटक होईल.

या घटनेमुळे शेळगाव परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. मनीषा खोमणे यांच्या मागे कुटुंबीय, नातेवाईक आणि दोन लहान मुले आहेत. या क्रूर घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा उघडकीस आला आहे.

# गणित आनंददायी पद्धतीने शिकवावे : प्राचार्य शिरसाट




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** विद्यार्थ्यांनी जावा प्रोग्रामिंगद्वारे तयार केलेल्या कॅल्क्युलेटरचे सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. गणित आनंददायी पद्धतीने शिकवावे, असे मत प्राचार्य तुकाराम शिरसाट यांनी व्यक्त केले.

मुखई (ता. शिरुर) येथील कै. रामराव गेणुजी पलांडे माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध गणितीय प्रकल्पांच्या प्रदर्शनाने कार्यक्रम उत्साहात पार पडला. श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून संस्थेच्या अध्यक्षा जयश्री पलांडे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गणित रांगोळी, भूमितीय आकृती, भाषणे, प्रश्नमंजुषा, गणितीय उखाणे व विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

# घरालगत ऊसशेती; उत्तर पुणे जिल्ह्यात बिबट्यांची वाढती दहशत

## ऊस गाळप हंगामामुळे बिबटे सैरभैर; नागरिकांमध्ये भीती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** उत्तर पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, खेड, जुन्नर व शिरूर तालुक्यांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे अनेक गावांमध्ये घरालगतच ऊसाची शेती असल्याने बिबट हल्ल्यांचा धोका अधिक वाढला आहे.

नोव्हेंबरपासून ऊस गाळप हंगाम सुरू झाल्याने बिबट्यांची नैसर्गिक लपणस्थाने नष्ट होत असून बिबटे सैरभैर झाल्याचे चित्र आहे. गेल्या तीन-चार महिन्यांत बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली असून पाळीव जनावरांबरोबरच नागरिकांवरही हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड व जांबुत येथे दिवाळीच्या काळात बिबट्याच्या हल्ल्यात एका ज्येष्ठ महिला व एका शाळकरी विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. त्यानंतर वनविभागाने या परिसरातून २२ बिबट्यांना जेरबंद केले आहे.

घरांच्या ओट्यापासूनच ऊसशेती सुरू असल्याने रात्री उसात दबा धरून सकाळी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांवर हल्ले होण्याचे प्रकार वाढले आहेत. भीतीमुळे अनेकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून त्यातील चित्रीकरण व्हायरल होत असल्याने दहशतीत भर पडत आहे.

घर व गोठ्याभोवती तारेचे कुंपण, पुरेशी प्रकाशयोजना करण्याची गरज व्यक्त होत असून शेतात वास्तव्यास असलेल्या धनगर व मेंढपाळांनी विशेष सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी : डॉ. वसंत हंकारे



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकरफाटा :** आई वडील मुलांना फक्त जन्म देत नसून, त्यांचे पालन पोषण करण्यासाठी अपार कष्ट घेत असतात. मुलांनी देखील आपल्या आई वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांच्या आज्ञेचे पालन करावे. संस्कार आणि चांगल्या सवयी बाजारात विकत मिळत नसून त्या शाळेत रुजवल्या जातात. आई वडील हेच खरे आपले दैवत आहेत, असे मत मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी व्यक्त केले.

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित सरस्वती विद्यालय उदापूरचे स्नेहसंमेलन उत्साहात झाले. याप्रसंगी कन्सल्टिंग सर्व्हिसेस प्रा.लि. पुणेचे सिनि.टीम लीड सुधीर दत्तात्रय शिंदे, उद्योजक रामदास भोर, अकाउंट मॅनेजर सुनील हरिभाऊ ढोबळे, सरपंच सचिन आंबडेकर, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे उपस्थित होते. यावेळी देवेन नामदेव शिंदे यांची भारतीय लष्करात लेफ्टनंट पदी नियुक्ती झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी प्रास्ताविक केले. साईनाथ भोर यांनी स्वागत केले. योगेश गाढवे यांनी आभार मानले. लतीफ मोमीन,विठ्ठल डुंबरे, प्रमोद जाधव, दशरथ भाईक, भरत भाईक, सुरेखा ढमाले, रोहिणी घाटकर, सारिका डांगे, राजेश दुधवडे, प्रसन्ना तांबे, विजय देशमुख, सुनील शितोळे, रमेश काळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

# टाकळी भीमात ऊसाच्या फडात बिबट्याचे बछडे आढळले



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** टाकळी भीमा (ता. शिरुर) येथील बाळोबाची वाडी परिसरात ऊस तोड सुरू असताना शेतात दोन बिबट्याचे बछडे आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन बछड्यांना सुरक्षित ताब्यात घेतले.

पृथ्वीराज वडघुले यांच्या शेतात ऊसाच्या फडात कामगारांना बिबट्याचे दोन बछडे दिसल्यानंतर वनविभागाला कळविण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे व वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली नियतक्षेत्र वनअधिकारी प्रमोद पाटील, वनविभाग व रेस्क्यू टीमने कारवाई करत बछड्यांना सुरक्षित ठिकाणी ठेवले. परिसरातील शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे.



# पाबळ येथील पद्ममणी जैन इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाबळ :** पाबळ येथील श्री पद्ममणी जैन इंग्लिश स्कूलचा २४ वा वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांच्या सादरीकरणाने उत्साहात पार पडला. पालक, शिक्षक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत आनंदी वातावरणात हा कार्यक्रम झाला.

नर्सरी ते दहावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या व ५०५ विद्यार्थी-विद्यार्थिनी असलेल्या या शाळेच्या स्नेहसंमेलनात नृत्य, नाट्य व गीतांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. आचार्य महाबोधी यांनी प्रवचनरूपी आशीर्वाद दिले. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सोपानराव जाधव, माजी सरपंच सचिन वाबळे, पाबळ पोलीस स्टेशनचे देशमुख साहेब, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गायकवाड, निकेत घाटकर, नितीन गायकवाड, तसेच भैरवनाथ विंद्य मंदिर पाबळ येथील प्राचार्य एस. डी. पिंगळे उपस्थित होते.

# बागायत ऊस पट्ट्यात केळीची लागवड वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यासह उत्तर पुणे जिल्ह्यात बागायत क्षेत्रात उसाबरोबरच केळी पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात वाढताना दिसून येत आहे. शाश्वत पाणी उपलब्ध झाल्याने शेतकरी केळी या नगदी पिकाकडे वळू लागले आहेत.

आंबेगाव तालुक्याला वरदान ठरलेल्या डिंभे धरणामुळे (हुतात्मा बाबू गेणू जलाशय) डावा-उजवा कालवा तसेच घोडनदीला नियमित पाणी मिळत आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांनी उसासोबतच केळी, भाजीपाला व वेलवर्गीय पिकांची लागवड सुरू केली आहे. मागील तीन वर्षांत अनेक शेतकऱ्यांनी उसाऐवजी केळी उत्पादनाला पसंती दिली आहे.

# मुखई आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे 'बाल वैज्ञानिक' स्पर्धेत घवघवीत यश




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** मुखई (ता. शिरुर) येथील कै. रामराव गेणूजी पलांडे माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील नववीच्या विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत प्रथमच सहभाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विज्ञान विषय भक्कम व्हावा व विज्ञान क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शाळेत विज्ञान फाउंडेशन कोर्स राबविण्यात येत आहे. त्याचाच परिणाम म्हणून नववीच्या ३७ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला. त्यापैकी विश्वजीत जाधव, श्रेया सुडीत, विरश्री पलांडे, आर्यन भुजबळ, श्वेता तांदळे, मयूर पुंड, हर्षवर्धन लवांडे, प्रेमराज सानप, यशराज पलांडे, प्राची मांढरे, आदित्य भाकरे, सोहम व सार्थक फरतारे, यश पायगुडे यांनी यश मिळवले. विद्यार्थ्यांना शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# चांडोली खुर्दमध्ये गायरान जमिनीवर सौर प्रकल्पाबाबत ग्रामस्थांचा विरोध



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत चांडोली खुर्द (ता. आंबेगाव) येथील गायरान गट क्रमांक ४८१/१/अ मधील १२ हे.०८ आर क्षेत्र सौर प्रकल्पासाठी देण्यात येऊ नये, अशी ठाम मागणी ग्रामपंचायत चांडोली खुर्द व ग्रामस्थांनी केली आहे. गायरान जमिनीवर सौर प्रकल्प उभारण्यास ग्रामस्थांचा तीव्र विरोध असून याबाबतपुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना भाजप उद्योग आघाडीचे जिल्हा संयोजक प्रमोद बाणखेले, चांडोली खुर्दचे उपसरपंच अमोल दाभाडे व ग्रामस्थांनी संयुक्तरित्या निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे महसूल

**जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन**

शाखेच्या दि. २८ ऑगस्ट २०२३ च्या आदेशानुसार गायरान क्षेत्र सौर प्रकल्पासाठी देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आले आहे.

यापूर्वी गायरान गट क्रमांक २३३ मधील ६ हेक्टर क्षेत्र मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीस देण्यात आलेले आहे. उर्वरित गायरान क्षेत्र हे घोडनदीच्या किनारी व पाणथळ स्वरूपाचे असून बैलगाडा घाट, सार्वजनिक कार्यक्रम व विविध ग्रामस्तरीय उपक्रमांसाठी वापरात आहे. या ठिकाणी सौर प्रकल्प उभारल्यास ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## रुग्णांच्या आरोग्याशी थेट खेळ

# ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्र 'व्हेंटिलेटरवर'!

■ दैनिक राज्य लोकतंत्र






**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय बनली असून, रुग्णांची हेळसांड, औषधांचा तुटवडा, तपासणीविना उपचार आणि अस्वच्छतेचा विळखा यामुळे संपूर्ण आरोग्य यंत्रणाच जणू 'व्हेंटिलेटरवर' असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. सरकारी आरोग्य व्यवस्थेवर अवलंबून असलेल्या ग्रामीण रुग्णांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

या आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची प्राथमिक तपासणी न करता थेट औषधे दिली जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. रुग्ण सतीश भोईर यांनी ही बाब उघडकीस आणत, "आम्हाला तपासणी न करता फक्त औषधे देऊन घरी पाठवले जाते," अशी स्पष्ट तक्रार केली. यामुळे चुकीच्या उपचारांमुळे रुग्णांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, आरोग्य केंद्रात अनेक आवश्यक औषधे उपलब्ध नसल्याने डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून रुग्णांना बाहेरून औषधे आणण्यास सांगितले जात आहे. सरकारी दवाखान्यात मोफत उपचार मिळायला हवेत, मात्र गरीब व गरजू रुग्णांना खासगी मेडिकलमध्ये पैसे खर्च करावे लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. औषधेच नसतील, तर प्राथमिक आरोग्य केंद्राचा उपयोग तरी काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

या गंभीर प्रकारात आणखी भर म्हणजे आरोग्य केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच वैद्यकीय कचरा खुलेआम टाकण्यात आला आहे. वापरलेल्या सिरिंज, इंजेक्शनच्या रिकाम्या बाटल्या, औषधांचे अवशेष आदी घातक कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका वाढला आहे. याच मार्गाने महिला, वृद्ध व लहान मुले दवाखान्यात ये-जा करत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

वैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना येथे नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय, आरोग्य केंद्रात स्वच्छतेचा पूर्णतः अभाव असून पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे आणि रुग्णांसाठी बसण्याच्या सुविधाही अपुऱ्या असल्याची तक्रार करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा शासनाचा उद्देशच धोक्यात आल्याचे चित्र आहे.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले, "आरोग्य केंद्रात संपूर्ण औषध उपलब्ध आहे. तरीही रुग्णांना औषधोपचार मिळत नसतील, तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल." दरम्यान,"आठ दिवसांत आरोग्य यंत्रणा सुधारली नाही, तर निवडणुकीच्या अगोदर प्राथमिक आरोग्य केंद्राला टाळे ठोकू," असा इशारा भाजपचे अध्यक्ष दत्तात्रय डुंबरे यांनी दिला आहे.

## सारांश वृत्त

### केरळ मॉब लिंचिंग; दोघांना अटक

**पलक्कड (केरळ) :** येथील वालायर जवळील किझाकेट्टाप्पल्लम येथे झालेल्या कथित जमावाच्या मारहाणीप्रकरणी आणखी दोघांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले. अटक केलेल्यांची ओळख पटली असून अट्टापल्लम येथील विनोद आणि जगदीश अशी त्यांची नावे आहेत. १७ डिसेंबर रोजी रामनारायण वर चोर असल्याचा संशय घेऊन हल्ला करणाऱ्या जमावाचा हे दोघेही सहभागी होते, असे पोलिसांनी सांगितले.

### बंगालच्या किमान तापमानात घट होणार

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील किमान तापमान दोन ते तीन अंश सेल्सिअसने कमी होण्याची शक्यता आहे, असे आयएमडीने आपल्या अंदाजात म्हटले आहे. यामुळे ख्रिसमस साजरा करण्याचे नियोजन करणाऱ्या लोकांमध्ये आनंद निर्माण होण्याची अपेक्षा आहे. पुढील सात दिवस पश्चिम बंगालमध्ये कोरडे हवामान राहील. गुरुवारपर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये एक किंवा दोन ठिकाणी उथळ ते मध्यम धुके पडण्याची शक्यता आहे, असेही आयएमडीने म्हटले आहे.




### ऑर्डनन्स फॅक्टरीला बॉम्बची धमकी

**इटारसी (मध्यप्रदेश) :** मध्य प्रदेशातील इटारसी शहरातील एका ऑर्डनन्स फॅक्टरीला बॉम्बने उडवण्याच्या धमकीचा ईमेल मिळाला, ज्यामुळे पोलिसांनी परिसराची कसून तपासणी सुरू केली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. नर्मदापुरम जिल्ह्यातील आयुध कारखान्याच्या परिसरात आतापर्यंत काहीही संशयास्पद आढळलेले नाही, असे त्यांनी सांगितले. सोमवारी रात्री ऑर्डनन्स फॅक्टरीच्या अधिकृत पत्त्यावर ईमेलद्वारे धमकी पाठवण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

## युनूस सरकारविरोधात घोषणाबाजी

# बांगलादेश उच्चायुक्तालयाबाहेर निदर्शने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बांगलादेशात एका हिंदू तरुणाची जमावाने मारहाण करून हत्या केल्याच्या आरोपानंतर शुक्रवारी नवी दिल्लीतील बांगलादेश उच्चायुक्तालयाबाहेर मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार आणि धार्मिक स्थळांची तोडफोड केल्याचा आरोप करत निदर्शने केली. निदर्शनादरम्यान परिस्थिती तणावपूर्ण बनली आणि अनेक ठिकाणी पोलिसांशी संघर्ष झाल्याचे वृत्त आहे.



निदर्शकांनी भारत माता की जय, युनुस सरकार, शुद्धीवर या, आणि हिंदू हत्या थांबवा अशा घोषणा दिल्या. संतप्त जमावाने सुरक्षा बॅरिकेड्स हटवले. काही निदर्शकांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनुस यांचा पुतळाही जाळला. एका निदर्शकाने म्हटले, आपण आज आवाज उठवला नाही तर उद्या सर्वजण दिपू होतील. बांगलादेशच्या मयमनसिंग जिल्ह्यातील बालुका भागात २५ वर्षीय हिंदू तरुण दीपू चंद्र दास याला जमावाने मारहाण करून ठार केले. ही घटना कथित ईशनिंदेच्या आरोपांशी संबंधित असल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे भारतासह अनेक देशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. बांगलादेश पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत १२ जणांना अटक केल्याची पुष्टी केली आहे.

निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर, दिल्ली पोलिस आणि निमलष्करी दल आधीच हाय अलर्टवर होते. उच्चायुक्तालयाबाहेर तीन-स्तरीय बॅरिकेड्स उभारण्यात आले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी काही निदर्शकांना ताब्यात घेतले आणि नंतर बॅरिकेड्स पुन्हा बसवले. निदर्शनादरम्यान, एका व्यक्तीने ओरडून सांगितले, हा देश रामाचा आहे. हा देश कृष्णाचा आहे. आम्ही कोणालाही मारत नाही, परंतु आमच्या बहिणी आणि मुलींच्या सन्मानाचे उल्लंघन केले जात आहे.

दरम्यान, बांगलादेशने भारतातील आपल्या राजनैतिक आस्थापनांच्या सुरक्षेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. नवी दिल्ली आणि सिलिगुडी येथील घटनांनंतर बांगलादेशने भारतीय उच्चायुक्तांना बोलावले. बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की राजनैतिक आवारात हिंसाचार आणि धमक्या आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन करतात. भारताने सुरक्षेतील त्रुटींचे आरोप फेटाळून लावले आणि म्हटले की राजधानी दिल्लीतील निदर्शने अल्पकालीन होती आणि त्यात कोणताही धोका नव्हता.

## काँग्रेसच्या खात्यात फक्त ५३ कोटी रुपये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** या वर्षीच्या दिल्ली विधानसभा निवडणुकीनंतर राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या आर्थिक खुलाशांमध्ये देशातील प्रमुख पक्षांच्या आर्थिक स्थितीत मोठी तफावत दिसून आली आहे. या खुलाशानुसार, केंद्रात आणि आता दिल्लीत सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाकडे (भाजप) ६,९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त बँक ठेवी आहेत. त्यांचा मुख्य प्रतिस्पर्धी आणि देशातील सर्वात जुना पक्ष, काँग्रेसकडे पक्षाचे मुख्यालय, राज्य आणि जिल्हा युनिट्ससह फक्त ५३ कोटी रुपये आहेत.

मर्यादित निवडणूक उपस्थिती असूनही, बहुजन समाज पक्षाने (बसपा) त्यांच्या खात्यात ५८० कोटींपेक्षा जास्त रक्कम जमा केल्याचे एका अहवालात म्हटले आहे.

निवडणूक आयोगाला सादर केलेल्या तपशीलांनुसार, आम आदमी पक्षाच्या (आप) केंद्रीय युनिटकडे ९.९ कोटी रुपये, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) (सीपीएम) कडे ४ कोटी रुपये, भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडे (सीपीआय) फक्त ४१ लाख रुपये, तर बसपाच्या खात्यात ५८० कोटी रुपयांची रक्कम नोंदली गेली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीनंतर विविध पक्षांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या बँक बॅलन्स स्टेटमेंटवर आधारित हे आकडे आहेत.

दरम्यान, २४ ऑक्टोबर रोजी निवडणूक आयोगाकडे दाखल केलेल्या योगदान निवेदनात, काँग्रेस पक्षाला २०२४-२५ आर्थिक वर्षात ५१७ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्याची नोंद करण्यात आली आहे.

# 'तृणमूलला खातेही उघडू देणार नाही'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसमधून निलंबित झाल्यानंतर, आमदार हुमायून कबीर यांनी एका नवीन पक्षाची घोषणा केली. जेयूपी किंवा जनता उन्नयन पक्षाच्या माध्यमातून ते पश्चिम बंगाल निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जींविरुद्ध रणनीती आखत आहेत. त्यांनी असा दावा केला आहे की ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस मुस्लिम बहुल मुर्शिदाबाद जिल्ह्यात आपले खातेही उघडू शकणार नाही.

ते म्हणाले, १२ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मला ३५ मिनिटे वेळ दिला. त्या दिवशी मी काहीही मागितले नाही. २०११ मध्ये तृणमूल काँग्रेसने काँग्रेससोबत युती केली, परंतु मुर्शिदाबादमध्ये तृणमूल काँग्रेसला फक्त एक जागा मिळाली. तथापि, काँग्रेसला १४ जागा मिळाल्या. मी ममता बॅनर्जींना एकही जागा जिंकण्याचे आव्हान देतो. आम्ही मुर्शिदाबादमध्ये ममता बॅनर्जींचा पक्ष शून्यावर आणू, असा दावा त्यांनी केला. मी भारतीय जनता पक्षालाही इशारा देतो. जर तुम्ही २०० जागांवर उमेदवार उभे केले तर मी त्यांना १०० जागा जिंकू शकतो हे दाखवून देईन, अशा शब्दांत त्यांनी भाजपला इशारा दिला. विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना सत्तेवरून पायउतार करणे, हे त्यांचे ध्येय आहे. २०२६ मध्ये ममता बॅनर्जी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार नाहीत; त्या माजी मुख्यमंत्री असतील, असेही विधान त्यांनी केले.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या बाबरी मशिदीची पायाभरणी करण्याच्या निर्णयामुळे कबीर यांच्यावर नाराज होत्या. त्यामुळेच त्यांचे निलंबन करण्यात आले.

## लिओनेल मेस्सीच्या दौऱ्यादरम्यान गोंधळ प्रकरणी

# सीबीआय चौकशीचे आदेश देण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** १३ डिसेंबर रोजी फुटबॉल दिग्गज लिओनेल मेस्सीच्या दौऱ्यादरम्यान कोलकाता येथील साल्ट लेक स्टेडियममध्ये झालेल्या गोंधळाची केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर कोणताही अंतरिम आदेश देण्यास कोलकाता उच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

कार्यवाहक मुख्य न्यायाधीश सुजॉय पॉल आणि न्यायमूर्ती पार्थ सारथी सेन यांच्या खंडपीठाने सांगितले की, पोलिस एसआयटी तपास आणि उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील चौकशी त्यांच्या सुरुवातीच्या टप्प्यात आहे आणि तपास किंवा चौकशीत कोणत्याही अनियमितता दर्शविणारे कोणतेही पुरावे न्यायालयात सादर केलेले नाहीत. म्हणून, या टप्प्यावर, आम्ही या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास आणि तपास/चौकशीला स्थगिती देण्यास तयार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

तीन जनहित याचिकांद्वारे (पीआयएल) याचिकाकर्त्यांनी चौकशी सीबीआयकडे सोपवण्याची आणि प्रेक्षकांना तिकिटांचे पैसे परत करण्याची विनंती केली होती. विरोधी पक्षनेते आणि भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांच्यासह या याचिकाकर्त्यांना न्यायालयाने निराश केले आहे. या प्रकरणात अंतरिम दिलासा देण्याची याचिका फेटाळून लावताना न्यायालयाने असे म्हटले आहे की या टप्प्यावर तपासात हस्तक्षेप करण्यास किंवा स्थगिती देण्यास ते इच्छुक नाहीत.

खंडपीठाने टिप्पणी केली की, याचिकाकर्त्यांच्या सांगण्यावरून किंवा केवळ एखाद्या पक्षाने आरोप केले आहेत म्हणून, तपास सीबीआय किंवा इतर कोणत्याही एजन्सीकडे हस्तांतरित केला जाऊ शकत नाही. याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादांना उत्तर देण्यासाठी न्यायालयाने राज्य सरकार आणि कार्यक्रम आयोजकांना चार आठवड्यांच्या आत त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्ते दोन आठवड्यांच्या आत त्यांचे उत्तर दाखल करू शकतात.

# मल्ल्या भारतात परत केव्हा येणार ते सांगा...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** फरार उद्योगपती विजय मल्ल्या यांच्याविरुद्ध फरार आर्थिक गुन्हेगार कायद्याच्या अंमलबजावणीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना, तसेच कायद्यातील तरतुदींना आव्हान देणाऱ्या त्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना, उच्च न्यायालयाने विजय मल्ल्या यांना विचारले की, त्यांचा भारतात केव्हा परतण्याचा विचार आहे.

मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने असे नमूद केले की मल्ल्या यांच्या दोन याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. एक एफईओ कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देण्याशी संबंधित होती, तर दुसरी, फौजदारी अपील, विशेष न्यायालयाने मल्ल्याला एफईओ म्हणून घोषित करण्याच्या जानेवारी २०१९ च्या आदेशाला आव्हान देत होती.

मुंबई उच्च न्यायालयाने असे नमूद केले की फौजदारी अपीलातील कार्यवाहीवरून असे दिसून आले की या प्रकरणावर अद्याप युक्तिवाद झालेला नाही. या न्यायालयात निर्णय प्रलंबित असलेल्या या दोन्ही प्रकरणांचा विचार करता, आमचे मत आहे की दोन्ही याचिका एकत्र चालवता येणार नाहीत. मल्ल्याचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ वकील अमित देसाई यांना न्यायालयाने १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीदरम्यान निर्णय घेण्यास आणि न्यायालयाला कळविण्यास सांगितले. देसाई म्हणाले की त्यांच्या अशिलाने दायित्वे फेडण्यासाठी पत्रे लिहिली आहेत, तेव्हा चंद्रशेखर यांनी विचारले, जोपर्यंत तुम्ही न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही तोपर्यंत आम्ही काही कसे करू शकतो? आम्ही उपाय देत आहोत. आधी भारतात परत या आणि नंतर आम्ही पुढील तारखेला याचिकेवर सुनावणी करू.

देसाई म्हणाले की, मल्ल्याने सर्व प्रकरणे बंद करण्यासाठी सरकारकडे निवेदने दिली आहेत, कारण अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्यांची १४,००० कोटींहून अधिक किमतीची मालमत्ता जप्त केली आहे, तर पूर्वी त्यांची देयता ६,००० कोटी रुपये होती.

## काँग्रेस खासदार इम्रान मसूद यांनी उधळली स्तुतीसूमने

# प्रियंका पंतप्रधानपदाच्या दावेदार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** काँग्रेस खासदार इम्रान मसूद यांनी काँग्रेसच्या सरचिटणीस आणि वायनाडच्या खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांचे कौतुक केले आणि त्या पंतप्रधानपदाच्या दावेदार आहेत, असे म्हटले. मसूद यांनी प्रियंकांची तुलना त्यांच्या आजी आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी केली. बांगलादेशातील धार्मिक अल्पसंख्याकांवरील वाढत्या हिंसाचाराबद्दल प्रियंकाच्या वक्तव्याचे समर्थन करताना मसूद यांचे हे विधान आले.

इम्रान मसूद म्हणाले, प्रियंका गांधी पंतप्रधान आहेत का? त्यांना पंतप्रधान बनवा आणि त्या इंदिरा गांधींप्रमाणे कशा व्यक्त होतात, ते पहा. त्या प्रियंका गांधी आहेत. त्यांच्या नावापुढे गांधी आहेत. त्या इंदिरा गांधी यांची नात आहे, इंदिरा गांधींनी पाकिस्तानचे इतके नुकसान केले आहे की त्या जखमांचे दुखणे अजूनही कायम आहे. त्यांना पंतप्रधान बनवा आणि त्या कशा प्रत्युत्तर देतात, ते पहा. तुम्ही असे करण्याचे धाडसही करणार नाही, अशा शब्दांत त्याने सरकारला आव्हान दिले आहे.

मसूद म्हणाले की, बांगलादेशातील हिंसाचाराच्या मुद्द्यावर प्रियंका गांधी सर्वप्रथम बोलल्या. गाझासारख्या आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही त्या बोलतात पण बांगलादेशातील अल्पसंख्याकांवर गप्प राहतात, या भाजपच्या आरोपाचे त्यांनी खंडन केले. प्रियंका गांधी वड्रा यांनी बांगलादेशातील हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्ध अल्पसंख्याकांविरुद्ध वाढत्या हिंसाचाराकडे लक्ष देण्याचे आवाहन सरकारला केले. बांगलादेशच्या मैमनसिंग जिल्ह्यात दीपू चंद्र दास या हिंदू तरुणाची क्रूर जमावाने हत्या केल्यानंतर हे आवाहन करण्यात आले.

प्रियंका गांधी यांनी म्हटले की, बांगलादेशमध्ये हिंदू तरुण दीपू चंद्र दास यांच्या क्रूर मॉब लिंचिंगची बातमी अत्यंत चिंताजनक आहे. कोणत्याही सुसंस्कृत समाजात धर्म, जात, ओळख इत्यादींवर आधारित भेदभाव, हिंसाचार आणि हत्या हे मानवतेविरुद्धचे गुन्हे आहेत. भारत सरकारने या शेजारील देशात हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्ध अल्पसंख्याकांवरील वाढत्या हिंसाचाराची दखल घ्यावी आणि त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा बांगलादेश सरकारसमोर जोरदारपणे उपस्थित करावा, असे त्यांनी म्हटले. १८ डिसेंबर रोजी, बांगलादेशच्या दिपू चंद्र दास यांना ईशनिंदेच्या आरोपाखाली जमावाने मारहाण करून ठार मारले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, हे आरोप ईशनिंदेशी संबंधित होते. बांगलादेशमध्ये व्यापक अशांतता आणि निषेधाच्या दरम्यान ही घटना घडली.

दरम्यान, इम्रान मसूद यांच्या विधानामुळे राजकीय गोंधळ उडाला आहे. काही काँग्रेसी नेते प्रियंका गांधी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून पाहण्याची मागणी करत आहेत, तर काही नेते राहुल गांधींनाच प्रमुख चेहरा मानत आहेत. काँग्रेसची धुरा कोण सांभाळणार, यावर पक्षातच मतभेद आहेत. प्रियंका यांना जबाबदारी द्यावी, असा एक प्रवाह असून, राहुल यांच्याकडेच ती जबाबदारी कायम असावी, असे एका गटाला वाटते.

# आयपीएल उपकरणांवरील आयात शुल्क कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आयपीएल क्रिकेट सामन्यांच्या प्रसारणासाठी आयात करण्यात आलेल्या उपकरणांवर लावण्यात आलेले सुमारे १७.३ कोटी रुपयांचे कस्टम शुल्क दिल्ली उच्च न्यायालयाने कायम ठेवले आहे. मात्र, चुकीची माहिती दिल्याच्या आरोपाखाली लावण्यात आलेला दंड न्यायालयाने लक्षणीय प्रमाणात कमी केला आहे. विशेष आर्थिक क्षेत्र नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट होत असल्याने शुल्क माफ करण्यास न्यायालयाने नकार दिला.

ही याचिका आयपीएल सामन्यांच्या थेट प्रसारणासाठी वापरल्या गेलेल्या अत्याधुनिक प्रसारण उपकरणांच्या आयातीशी संबंधित होती. संबंधित कंपनीने ही उपकरणे 'प्रात्यक्षिक' किंवा तात्पुरत्या वापरासाठी आयात केल्याचा दावा केला होता. मात्र, कस्टम विभागाच्या तपासात ही उपकरणे व्यावसायिक वापरासाठी, म्हणजेच आयपीएल सामन्यांच्या थेट प्रसारणासाठी वापरल्याचे उघड झाले. त्यातून मोठ्या प्रमाणात महसूलही मिळाल्याचे निदर्शनास आले.

कस्टम विभागाने असा युक्तिवाद केला की, विशेष आर्थिक क्षेत्रातून उपकरणे बाहेर काढताना लागू असलेल्या अटींचे उल्लंघन झाले असून, चुकीची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित आयातदारास शुल्क सवलतीचा लाभ देणे शक्य नाही. यावरून कस्टम विभागाने आयात शुल्कासह मोठ्या प्रमाणात दंडही लावला होता. या प्रकरणी सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सेझ अंतर्गत मिळणाऱ्या सवलती या केवळ विशिष्ट अटींच्या पूर्ततेवर अवलंबून असतात. जर उपकरणांचा वापर ज्या कारणासाठी सवलत देण्यात आली होती त्यापेक्षा वेगळ्या व्यावसायिक उद्देशासाठी झाला असेल, तर त्या सवलती आपोआप रद्द होतात. त्यामुळे कस्टम विभागाने लावलेले आयात शुल्क कायदेशीर आणि योग्य असल्याचे न्यायालयाने नमूद केले. मात्र, दंडाच्या बाबतीत न्यायालयाने काहीशी नरम भूमिका घेतली. चुकीची घोषणा झाल्याचे मान्य करत असतानाही, एकूण विचार करता लावलेला दंड जास्त असल्याचे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले. परिणामी, मूळ दंड मोठ्या प्रमाणात कमी करून मर्यादित रकमेपर्यंत आणण्यात आला.

## भारताकडून श्रीलंकेला मदतीचे पॅकेज

**कोलंबो :** परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी सांगितले की, चक्रीवादळ दितवा दरम्यान श्रीलंकेच्या पाठीशी उभे राहण्याचा भारताला अभिमान आहे आणि ४५० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे मदत पॅकेज प्रस्तावित केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष दूत म्हणून श्रीलंकेत असलेले जयशंकर यांनी श्रीलंकेच्या परराष्ट्र मंत्री विजिता हेराथ यांच्यासमवेत हे वक्तव्य केले. "श्रीलंका २०२२ च्या आर्थिक संकटातून सावरत असतानाच, या नैसर्गिक आपत्तीने नवीन अडचणी निर्माण केल्या आहेत," असे जयशंकर म्हणाले.

# उन्नाव प्रकरणातील भाजप आमदाराला दिलासा; जन्मठेप तात्पुरती स्थगित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात भाजपचे माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांची जन्मठेपेची शिक्षा तात्पुरती स्थगित केली आहे. सेंगर यांनी त्यांची १.५ दशलक्ष रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सुटका करण्याचे आदेशही दिले आहेत. तथापि, तुरुंगातून सुटका झाल्यावरही सेंगरवर अनेक अटी लागू असतील. यामध्ये पीडितेच्या पाच किलोमीटरच्या जवळ न येणे आणि दिल्लीतच राहणे समावेश आहे. पीडितेला कोणत्याही प्रकारे धमकावू नये आणि त्यांचा पासपोर्ट ट्रायल कोर्टात जमा करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत.



कुलदीप सिंह सेंगर यांनी दिल्ली उच्च न्यायालयात ट्रायल कोर्टाच्या जन्मठेपेला आव्हान दिले. त्यांनी खटला प्रलंबित असताना त्यांची शिक्षा स्थगित करण्याची मागणीही केली. वृत्तानुसार, न्यायालयाने सेंगरला दर सोमवारी पोलिसांकडे हजर राहण्याचे आदेशही दिले आहेत. त्यात असेही म्हटले आहे की एकाही अटीचे उल्लंघन केल्यास त्याचा जामीन रद्द केला जाईल.

२०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात कुलदीप सिंग सेंगर दोषी आढळले होते. या घटनेने संपूर्ण देशाला हादरवून टाकले. सेंगर यांच्यावर एका अल्पवयीन मुलीचे अपहरण आणि बलात्कार केल्याचा आरोप होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाने हा खटला उत्तर प्रदेशातून दिल्लीला हस्तांतरित केला. २०१९ मध्ये न्यायालयाने सेंगरला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्याला २५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला. चार वेळा आमदार राहिलेले कुलदीप सिंह सेंगर यांनीही आपले विधानसभा सदस्यत्व गमावले. भाजपमध्ये येण्यापूर्वी त्यांनी काँग्रेस, बसपा आणि समाजवादी पक्षातही काम केले होते.

## व्हिएतनामसह इंडोनेशियाबरोबर करार अंतिम टप्प्यात

# ब्रह्मोसच्या निर्यातीचा ४ हजार कोटींचा करार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांच्या निर्यातीसाठी भारत व्हिएतनाम आणि इंडोनेशियासोबतचे महत्त्वाचे करार अंतिम टप्प्यात आहेत. या करारांची एकूण किंमत ४,००० कोटी पेक्षा जास्त असण्याचा अंदाज आहे. भारत रशियासोबत ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचे सह-उत्पादन करतो. रशियाने भारताला आश्वासन दिले आहे की व्हिएतनाम आणि इंडोनेशियाला या शस्त्र प्रणालीच्या विक्रीला ते आक्षेप घेणार नाहीत.




संरक्षण सूत्रांचा हवाला देऊन माध्यमांनी असे वृत्त दिले आहे की, संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि त्यांचे रशियन समकक्ष आंद्रेई बेलौसोव्ह यांच्यात ४ डिसेंबर रोजी झालेल्या प्रतिनिधीमंडळ पातळीवरील बैठकीत हे आश्वासन देण्यात आले. आता मॉस्कोकडून औपचारिक ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळण्याची वाट पाहत आहे. सुरुवातीच्या करारांवर सहमती झाल्यानंतर, व्हिएतनाम आणि इंडोनेशिया भविष्यात पुढील ऑर्डर देऊ शकतात, असे एका सूत्राने सांगितले.

एकदा करार अंतिम झाले की, व्हिएतनाम आणि इंडोनेशिया हे एअर-ब्रेथिंग क्षेपणास्त्रे खरेदी करणारे फिलीपिन्सनंतरचे आसियान देश बनतील. भारताने जानेवारी २०२२ मध्ये फिलीपिन्सला तीन अँटी-शिप ब्राह्मोस कोस्टल बॅटरी पुरवण्यासाठी ३७५ दशलक्ष डॉलरच्या करारावर स्वाक्षरी केली. अहवालानुसार फिलीपिन्स आणखी ब्रह्मोस क्षेपणास्त्रे देखील ऑर्डर करू शकते. दक्षिण चीन समुद्रात चीनच्या आक्रमक रणनीती आणि विस्तारवादाबद्दल या तिन्ही देशांना लक्षणीय चिंता आहेत. अलिकडच्या काळात, फिलीपिन्स आणि चीनमधील संघर्ष वाढला आहे.

भारताच्या बाजूने, ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचा पल्ला मूळ २९० किलोमीटरवरून ४५० किलोमीटरपर्यंत वाढवण्यात आला आहे. मे महिन्यात ऑपरेशन सिंदूर दरम्यान, भारताने सुखोई ३० या लढाऊ विमानातून ही क्षेपणास्त्रे यशस्वीरित्या तैनात केली, ज्यामुळे पाकिस्तानमधील खोल समुद्रातील लक्ष्यांवर अचूक मारा झाला. ब्रह्मोस व्यतिरिक्त, भारत स्वदेशी आकाश हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आणि पिनाका मल्टी-लाँच रॉकेट प्रणाली फिलीपिन्स, इंडोनेशिया आणि व्हिएतनाम तसेच संयुक्त अरब अमिराती आणि ब्राझील सारख्या इतर मित्र देशांना विकण्याचा विचार करत आहे. गेल्या आर्थिक वर्षात, भारताने अंदाजे २४,००० कोटी रुपयांची शस्त्रास्त्र सामुग्री निर्यात केली. ब्रह्मोस ही भारतीय हवाई दल, नौदल आणि लष्करासाठी एक प्रमुख पारंपारिक (नॉन-न्यूक्लियर) अचूक स्ट्राइक शस्त्र प्रणाली बनली आहे. भारत २०२८ पासून नवीन ८०० किमी पल्ल्याच्या ब्रह्मोसचा समावेश करण्याची योजना आखत आहे.